जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -२०२ दिनांक - ०१/०४/२०२४**

वानवडी पोलीस स्टेशन,पुणे शहर

## हांडेवाडी परिसरात घरफोडी करणा-या रेकॉर्डवरील चोर जेरबंद

दि.१९/०३/२०२४ रोजी फिर्यादी यांचे घरातून लॅपटॉप, दोन मोबाईल असा एकूण ८५,०००/- रु.चा मुद्देमाल चोरीला गेला होतो. त्याबाबत वानवडी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. २१६/२०२४ भा.द.वि.कलम ४५७,३८०प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

दाखल गुन्हयाचे अनुषंगाने वानवडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री संजय पतंगे यांनी तपास पथक प्रभारी व स्टाफ यांना गुन्हयाचे अनुषंगाने मार्गदर्शन करुन सीसीटिव्ही चेकींग, रेकॉर्डवरील गुन्हेगार चेकींगसाठी दोन पथके तयार केली होती. तपासादरम्यान सदर घरफोडी ही रेकॉर्डवरील गुन्हेगार **१) अल्ताफ ऊर्फ एम सी स्टँड हमीद शेख, वय २० वर्षे, रा. ग.नं. १६, सय्यदनगर, हडपसर, पुणे, २) आलीम साहेब पटेल, वय १९ वर्षे, रा.ग.नं.१२,सय्यदनगर,हडपसर, पुणे** यांनी केली असल्याची माहिती बातमीदारामार्फत मिळाल्याने तात्काळ सदर बाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री पतंगे यांना कळवून तपास पथक प्रभारी संतोष सोनवणे व स्टाफ रवाना झाले. मिळालेल्या माहितीचे आधारे चोरी करणारे वरील आरोपींना ताब्यात घेवून त्यास अटक करण्यात आली.

नमूद अटक आरोपी याचेकडे अधिक तपास करता त्याने गु.र.नं. २१६ /२०२४ भा.द.वि.कलम ४५७,३८० हा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले असून त्यांचेकडून गुन्हयात चोरी गेलेला **लिनोव्हा कंपनीचा लॅपटॉप, एक ॲपल कंपनीचा मोबाईल व एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल असा एकूण ८५,०००/- रु. कि. मुद्देमाल जप्त** करुन गुन्हा उघडकीस आणलेला आहे सदर गुन्हयाचा तपास पोलीस अंमलदार हरीदास कदम हे करत आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस उप आयुक्त परि.५, पुणे शहर श्री आर राजा, मा. सहा. पोलीस आयुक्त वानवडी विभाग पुणे शहर श्री गणेश इंगळे, वानवडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्री.संजय पतंगे,पोलीस निरिक्षक (गुन्हे) श्री.राजेंद्र करणकोट यांचे मार्गदर्शना खाली, तपास पथकातील पोलीस उपनिरिक्षक संतोष सोनवणे, पोलीस अंमलदार हरिदास कदम, अमजद पठाण, विनोद भंडलकर, अतुल गायकवाड, सर्फराज देशमुख, महेश गाढवे, संदिप साळवे, विष्णु सुतार, यतिन भोसले, अमोल गायकवाड, गोपाल मदने यांनी केली आहे.